# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>सआपीउ / ०१४६१ / अनु. (अति. निर्मु.) दि. १६.०४.२०२१</u>

## <u>जाहिरात</u>

**<u>विषय</u> :** पी/उ विभागामध्ये सन २०२१–२२ या वर्षाकरिता, अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता अतिक्रमणनिर्मुलन वाहनावर काम करण्याकरिता अशासकीय संस्थामार्फत कंत्राटी कामगार पुरवठा करण्याबाबत.

पी/उ विभागामध्ये सन २०२१–२२ या आर्थिक वर्षातील सहा महिन्याकरिता, अतिक्रमण निर्मुलन वाहनावर काम करण्याकरिता स्थानिक अशासकीय संस्थेकडून कंत्राटी कामगार पुरवण्याबाबत, ०१ अशासकीय संस्थेची निवड करण्याकरिता, सदर वाहनावर काम करण्याचा अनुभव असणाऱ्या, तसेच पी/उ विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणीकृत असणाऱ्या इच्छुक स्थानिक अशासकीय संस्था, मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, रोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था इ. संस्थाकडून त्याची पात्रता यादी तयार करून सोडत पद्धतीने निवड करून काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या निवड झालेल्या संस्थेकडून प्रति दिन ०८ तासाकरिता एकूण बारा कामगारांची आवश्यकता आहे.

अर्जाचा नमूना, वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन खाते (अतिक्रमण निर्मुलन विभाग), आठवा मजला, लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड पश्चिम मु. ६४ यांच्याकडे रु. १७००/– अधिक ५ % जीएसटी असे रोख स्वरुपात (ना–परतावा) दि**<u>. १७/०४ /२०२१ ते दि. २२/०४/२०२१ या कालावधीत</u>** स. ११ ते दु. ०२ वाजेपर्यंत मिळू शकेल. निकषानुसार पात्र सूची मधून सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या एका संस्थेला कामाचे वाटप पी/उ विभागाचे सहाय्यक आयुक्त, योजनेच्या अटीं व शर्तीनुसार करतील, नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सोडत पद्धतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार, सहाय्यक आयुक्त पी/उ विभाग यांना राहतील.

अर्ज करण्याची **<u>अंतिम तारीख दि. २३ /०४/२०२१</u>** (दुपारी ०१ वाजेपर्यंत) राहील.

सही/–

**सहाय्यक आयुक्त पी/उ विभाग कार्यालय**
**बीजी पटेल मार्ग, मालाड (प.) मुं. ६४**